ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - XI Issue - I January - March - 2022

MARATHI PART - I

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
[illegible]
[illegible]

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २६ | सम्यक समाधि सुखी जीवन जगण्याचा मार्ग<br>**सुकेशनी शंकर सूर्यवंशी** | १३८-१४० |
| २७ | म. ज्योतीबा फुले यांचा गुलामगिरी विषयीचे विचार<br>**प्रा. डॉ. आर. डी. खताळ** | १४१-१४४ |

VOLUME - XI, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# २७. म. ज्योतीबा फुले यांचा गुलीमगिरी विषयीचे विचार

**प्रा. डॉ. आर. डी. खताळ**
कला आणि विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी ता. गेवराई, जि. बीड.

**प्रस्ताविक**

नवीन भारताच्या निर्मितीसाठी भारतातील विविध विचारवंतानी मोलाचे कार्य केले. त्यातील एक प्रमुख नाव म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले होय. तत्कालिन समाज व्यवस्थेत देवदेवता, कर्मकांड, अंधश्रध्दा आणि उच्चवर्णियांची हुकूमशाही पेशवेकालीन जुलूम इत्यादीमुळे सर्वसामान्य जनता हवालदिल झाली होती. हिंदू धर्माची मुळ धार्मिक बैठक बाजूला करुन कनिष्ट वर्गातील लोकांवर अत्याचार होत होते. धर्माच्या नावाखाली निम्न वर्गावर अन्याय केला जात होता. उच्च वर्णियांची सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रातील मक्तेदारी वाढली होती. अशा दयनिय अवस्थेत अशोंचा किरण ज्योतिबा फुले यांच्या माध्यमातून समाजासमोर दिसला. म.ज्योतिबा फुले हे स्वंयभू, स्वंयप्रज्ञ,स्वंयस्फूर्त, स्वावलंबी, स्वातंत्र,मौलिक विचारव ंत आणि क्रांतीकारी विचारवंतापैकी एक होत. त्यांच्या तोडीचा एवढा मोटा सुधारक महाराष्ट्राबाहेर तत्कालिन व्यवस्थेत दिसून येत नाही. ज्योतिबांचे कर्तृत्व, व्यक्तिमत्व, धाडस, निर्भयता, निर्भिडपणा व तडजोड न करणारी ध्येयनिष्ठा वाखाणण्यासारखी होती. एका सामान्य माळी कुटूंबात जन्मलेल्या मुलाचा एक महापुरुष बनला. पारंपारिक सामाजिक विचारान क्रांतीकारी परिवर्तन घडवून आणारा हा पहिला समाजसुधारक होय. जोतीराव फुल्यांच्या विचारात गुलामगिरी विषयीच्या विचाराला एक प्रमुख विचार म्हणून मान्यता मिळालेली आहे.

**संशोधनाचा उद्देश**

महात्मा जोतिबा फुले यांच्या गुलामगिरी बाबतच्या विचारांचा अभ्यास करणे.

**संशोधनाचे गृहितके**

महात्मा फुले यांचं गुलामगिरी विषयीच्या विचाराला अधिक महत्वाचे स्थान आहे.

गुलामगिरी या ग्रंथात फुले म्हणतात, मनुष्याला स्वतंत्रता असणे ही एक मोठी बाब आहे. जेव्हा मनुष्य स्वतंत्र असतो, तेव्हा त्यास आपले मनातील विचार स्पष्टरितीने इतर लोकांस बोलून अथवा लिहून दाखविता येतात. तेच विचार त्यास स्वातंत्र्ता नसल्यामूळे मोठे महत्त्वाचे असून हितावह असून दुसरे कोणास कळविता येत नाहीत. आणि असे झाले म्हणजे काही काळाने ते सर्व विचार लयास जातात. यावरुन मानवी स्वातंत्र्यावर गदा आणणारे वर्तन म्हणजे गुलामगिरीचे वर्तन होय. याच आधारावर फुलेंनी सामाजिक,आर्थिक,धार्मिक शैक्षणिक क्षेत्रातील गुलामगिरी विषयीचे आपले विचार मांडले.

1. सामाजिक गुलामगिरी

भारतीय समाजातील गुलामगिरीस जातीव्यवस्था पूर्णत: जबाबदार आहे. जातीची श्रेणीरचना माणसांच्या समानतेच्या तत्वावर आधारलेली आहे. मानवातील समानता जाती व्यवस्थेला मान्य नाही. म्हणूनच फुले जाती-व्यवस्थेचा आणि समर्थन करणाऱ्या धर्माचा धिक्कार करतात. ज्या उच्च वर्णियांनी पवित्र धर्मग्रंथ लिहून जाती संस्थेला धार्मिक समर्थन असल्याचा अभास निर्माण करुन ती समाजात रुजविली त्या वरिष्ठ वर्णियांनाच या व्यवस्थेचा फायदा मिळाला. तत्कालिन म्हणजे पेशवाई राजवटीने गुलामगिरीचा कळस केला होता. सामाजिक गुलामगिरीतून शुद्रातिशुद्रांना पशुतुल्य वागणूक मिळत होती म्हणूनच इ.स.1872 मध्ये त्यांनी अस्पृश्यांता विरोधी जाहीरनामा प्रकाशित केला.

म.फुले यांच्या मते, मानवाला-मानवासारखे जगू दिले पाहिजे. मानवाला गुलामाप्रमाणे जीवन जगण्यास प्रवृत्त करणे हा माणूसकीला लागलेला कलंक होय. भारतीय समाजातील गुलामगिरीस जातीव्यवस्था जबाबदार आहे. जातीची श्रेणी रचना मानवाच्या समानतेच्या तत्त्वावर आधारलेली नाही. सर्व मानसे समान आहेत हे तत्व जाती व्यवस्थेला मान्य नाही. ज्या वरिष्ठ वर्णियांनी तथाकथित पवित्र धर्मग्रंथ लिहून जाती संस्थेला धार्मिक समर्थन असल्याचा अभास निर्माण करुन ती समाजात रुजविली. त्या वरिष्ठ वर्णियांनाच या व्यवस्थेचा फायदा मिळाला. या जातीव्यवस्थेनेच सर्व अब्राम्हणी समाजावर कायमची गुलामगिरी लादली व शुद्रांची अवस्था गुलामाहूनही वाईट करुन टाकली.

2. आर्थिक गुलामगिरी

तत्कालिन समाज व्यवस्थेत समाजातील कनिष्ठ जातीतील लोकांना सर्व प्रकारच्या धार्मिक विधीपासून ईश्वरी दर्शनापासून दूर ठेवले गेले होते. भारतीय समाजातील गुलामगिरीला जाती व्यवस्थेची मान्यता होती आणि जातीव्यवस्थेला धर्माचे अधिष्ठाण प्राप्त झाले होते. धर्माच्या नावाखाली सर्वसामान्यांना गुलाम बनविण्याचे काम हा होते. धर्माच्या नावाखाली या निम्नवर्णिय लोकांना धर्मद्रोह पाहून धार्मिक गुलामगिरीची कल्पना त्यांनी मांडला. वास्तविकत: मुळचा हिंदू धर्म असा नव्हता. पण समाजातील उच्चवर्णियांनी स्वत:च्या स्वार्थासाठी विकृती आणली. जूनाट आणि चालीरिती व अंधश्रध्दा निर्माण केली. आपआपसातील जातीभेद माजवून उच्चनीचतेच्या आधारावर विविध प्रकारच्या सोवळ्या-ओवळयाच्या कल्पना निर्माण केल्या आणि देवाचा दर्जा स्वत:ला मिळवून घेतला. पेशवाईत तर शुद्र-अतिशुद्रांनार दिली जाणारी अमानुष वागणूक याला धार्मिक आधार देण्याचे काम समाजातील उच्च-वर्णियांनीच केले. म.फुले यांच्या मते सर्व मानसे एकाच ईश्वराची लेकरे आहेत आणि तोच सर्वांचा पिता आहे. त्यामुळे ईश्वराची ओळख करुन देण्यासाठी उपाध्याय किंवा धर्मगुरु सारख्या मध्यस्थाची गरज नाही. अशाप्रकारचे तत्व मान्य असणराच गुलामगिरीतून मुक्त होईल. अशाप्रकारे धार्मिक गुलामगिरीबाबत तार्किक अधिष्ठाणावर विषमतेच्या अमानूष तत्त्वावर अंधश्रध्दा आणि तत्सम समजुतीवर अनेकेश्वर वादावर आणि अर्थशून्य कर्मकांडावर निर्भिडपणे आपले विचार मांडले.

3. शैक्षणिक गुलामगिरी

एकोणिसाव्या शतकात उच्चवर्णिया शिवाय इतरांना शिक्षण घेण्यास मज्जाव होता. भेदाभेद, विषयमता,उच्च-नीच स्पृश्य-अस्पृश्य,सोवळे-ओवळे, पवित्र-अपवित्र इ.बाबीचे समाजात स्तोम माजले होते. अशा परिस्थितीत शिक्षणाचा प्रसार हेच

ध्येय डोळ्यासमोर ठेवून म.फुलेंनी कार्य केले. ब्रिटिश राजवटीत भारतात शिक्षणचे दारे शुद्रांसाठी खुली असली तरी शिक्षण घेण्यात हा वर्ग मागेच होता. यावर फुलेंनी नाराजी व्यक्त केली. एकीकडे ब्रिटिश सरकारचा शिक्षणावरील खर्च वाढत असताना दुसऱ्या बाजूला सुशिक्षित शुद्रांची संख्या वाढत नव्हती. कारण हे सरकार उच्च शिक्षणावरील खर्च वाढवित असले तरी प्राथमिक शिक्षणाकडे मात्र दुर्लक्ष करीत आहे ही शिक्षण पध्दती उच्चवर्णियाच्या विका ला पुरक आहे ते म्हणतात शिक्षणामुळे उच्चवर्णिय लोक सुसंस्कृत होतील व ते शुद्रांना सुसंस्कृत बनवतील, शुद्रांना फसवणार नाहीत हा ब्रिटिशांचा समज चुकीचा आहे. इतरांपासून शिक्षण लपवून ठेवण्याची त्यांची परंपरा आहे. त्यामुळे नव्याने प्राप्त झालेले हे इंग्रजी ज्ञान ते कितपत या सामान्य लोकांत पसरवतील याबाबत शंका वाटते. एकंदरित उच्चवर्णियांची शिक्षणातील ही मक्तेदारी शुद्रातिशुद्र शैक्षणिक गुलामगिरीचेच प्रतिक मानावे लागेल.

४. स्त्रियांची गुलामगिरी

तत्कालीन भारतीय समाजातील स्त्री अस्पृश्याप्रमाणेच दास्यत्वाचे जीवन जगत होती. तीचे जीवन घरातच चार भिंतीच्या आत बंदिस्त होते. स्त्री-शिक्षणावर बंदी बालविवाहाची प्रथा, व्दिभार्यापध्दती, पडदा पध्दती केशवपन, विधवा विवाहास बंदी, सती प्रथा यामुळे स्त्रीचे जीवन अत्यंत हालाखीचे झाले हे ते. अशा परिस्थितीत संपूर्ण समाजरचनेत क्रांतीकारी परिवर्तन केल्याशिवाय स्त्रीची गुलामगिरीतून खऱ्या अर्थाने मुक्तता शक्य नाही हे त्यांन ा कळाले म्हणून फुले यांनी 1891 मध्ये मुलींसाठी शाळा काढली. विधवा स्त्रियांसाठी आश्रम यात गर्भवती कुमारिका, गर्भवती विधवा महिला यांनाही आश्रय दिला. त्याच्या मते विवाह स्त्री-पुरुष आणि जन्मतात अर्भकाच्या आरोग्याच्या दृष्टीने हानीकारक असतात. बालविवाहामुळे बहुपत्नीत्वाला चालना मिळते. बालविवाहाचा परिणाम स्त्री शिक्षणावरही होतो. त्यामुळे स्त्रियांचे शिक्षण थांबते व त्यांना परावलंबी बनावे लागले.

म.फुले त्यांच्या मते, समाजात स्त्रियांना पुरुषापेक्षाही श्रेष्ठस्थान असावे. कारण त्या आपल्या पदरात बालकाला वाढवून पुढे त्यांचे संगोप ही करतात. स्त्रियांच्या तुलनेत पुरुष अधिक क्रूर, दुष्ट असतात. नैतिकतेबाबत स्त्री प्रमाणेच पुरुषावरही असावीत. पुरुषांना असणाऱ्या चुकांची शिक्षा स्त्रियांसाठी असाव्यात. पण समाजात याबाबत विषमता होती हे पुरुषप्रधान संस्कृतीचे दयोत्तक आहे हे थांबले पाहिजे. त्यासाठी स्त्री शिक्षण, स्त्री-पुरुष समानता हे तत्त्व स्विकारणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे स्त्रीयांच्या गुलामगिरीबाबतचे विचार म.फुले यांनी मांडले.

५ आर्थिक गुलामगिरी

तत्कालिन भारतीय समाजातील विषयमता दर्शविताना आर्थिक विषमता, सामान्य लोकांचे होणारे आर्थिक शोषण यावरही आपली भूमिका मांडली. यातून त्यांची ग्रामीण भागात राहणाऱ्या शेतकऱ्यांविषयी तसेच गरिब कष्ट करणाऱ्या शुद्रातिशूद्र विषयीची तळमळ स्पष्ट होते. ब्रिटिश काळात राजे रजवाडे होते. त्यांच्याकडे सरदार, मानकरी, शिलेदार, कारागीर, बारगीर, पायदळ, घोडदळ, उंटवाले अशा विविध पदांवर 'शुद्रातिशुद्रांतना' आणि कष्टकऱ्यांना नोकऱ्या मिळत. ग्रामीण भागातील प्रत्येक घरातून एकतरी माणूस अशा सेवेत होता. नोकरीत असलेले हे ग्रामीण भागातील आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहास हातभार लावीत. आज अशा नोकऱ्या नाहीत. असल्या तरी त्या ग्रामीण भागातील लोकांना मिळत

नाहीत. परिणामी शेतीवरील अवलंबित्व प्रचंड वाढले. त्यातच निसर्गाच्या लहरीवरील शेती ही जुगारच होय. शेतकऱ्यांना लग्न, सण, समारंभ, सरकारी कर भरणा, कर्जफेड करण्यासाठी कर्ज घ्यावे लागते. यासाठी सावरकाराकडे भांडी, घर, सोने, जमिन तारण ठेवावे लागत होते. मुदतीत कर्जफेड झाली नाही तर तारण जप्त केले जात होते. परिणामी शेतकरी देशोधडीला लागला. यातून त्यांची शेतकऱ्याविषयीची तळमळ, आत्मयता निदर्शनास येते.

## समारोप

भारतीय समाज विषमता, ग्रंथप्रामाण्य, तर्कदृष्टता, विवेकहिनता यासारख्या माणुसकीशून्य तत्त्वावर उभारण्यात आलेल्या होत्या. मानवाच्या काल्पनिक विषमतेला धार्मिक अधिष्टान खतपाणी घातले जात होते. भारतीय समाजात विविध पातळीवरुन ही विषयमता अस्तित्वात होती. मानसाचे स्तर गृहित धरुन त्यांच्यात श्रेष्ट-कनिष्ट-उच्च-नीच सांगणारी जातीव्यवस्था, निम्नवर्णियांना गुलामापेक्षाही वाईट वागणूक पशुतुल्य अस्पृश्यता, स्त्रियांना केवळ उपयोगाची वस्तू मानणारी पुरुषप्रधान संस्कृती इत्यादीचे निर्मूलन करुन नवसमाज निर्मितीचे स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. अशाप्रकारे म.जोतीबा फुले यांनी सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक,आर्थिक गुलामगिरीबाबतचे विचार मांडले. समाजातील मानवी समानतेविषयीचे त्यांचे विचार केवळ वैचारिक पातळीवरचे नव्हते तर त्यांनी प्रत्यक्षात तशी कृतीही केली. म्हणून फुलेंना कर्ते सुधारक म्हणून गौरविले जाते. अतिशुद्रांसाठी घरचा पाण्याचा हौद खुला केला. त्यांच्यासाठी शाळा काढली, विधवा, परितक्त्या, विधवा, गरोदर विधवा मुलींसाठी आश्रम काढला. पेशवाई काळातील राजधानी असलेल्या पुण्यात फुले यांनी प्रखर विरोधाभास तोंड देवून आपले सामाजिक सुधारणांचे कार्य सुरुच ठेवले. म्हणूननच म.जोतीराव फुले यांचे विचार आधुनिक समाजालाही दिशादर्शक ठरतात.

## संदर्भसूची

१. प्रा. ज्योती डोईफोडे मुलभूत सामाजिक विचार
२. डॉ. दा. ध्रो. काचोळे समाजशास्त्रीय विचारांचा मुलाधार
३. म.जोतीबा फुले गुलामगिरी
४. शंकर खरात अस्पृश्यांचा मुक्तीसंग्राम
५. रविंद्रनाथ मुखर्जीसमाजशास्त्रीय विचारधारा
६. व्हि.एन. गजेंद्रगडकर भारतीय समाजशास्त्र
७. प्रा.ना.स. वैद्य समाजशास्त्रीय विचारपरंपरा
८. प्रा.ना.ग.पवार भारतीय समाजक्रांतीचे जनक
९. अविनाश वसेकर महात्मा जोतीराव फुले